**दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला यांचे न्यायालयात.**
**नियमित दिवाणी मुकदमा नं. २२९/२०१४**
**निशाणी ७१ खालील आदेश**

(शोभावती वाघमोडे व इतर वि. शिवाजी भगवान पाटील)

प्रस्तुतचा अर्ज वादी क्र. ६ हिचे वारसांतर्फे वादी क्र. ०६ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला ०२ वर्षे ०४ महिने १७ दिवसांचा विलंब माफ करुन मिळावा, यासाठी दाखल केलेला आहे.

**०२.** वादी क्र. ६ चे वारसांचे कथनानुसार, सदरहू दावा वादींनी प्रतिवादी यांचे विरुध्द निरंतर ताकीदीचा दाख्ला केला असून दाव्यामध्ये सैदाबी अब्बास तांबोळी ही वादी क्र. ६ म्हणून आहे. सदर वादी क्र. ६ ही दि. २४/०९/२०२० रोजी दावा प्रलंबित असताना मयत झाली आहे. ती मयत झाली त्यावेळी कोरोनाचा प्रादुर्भाव चालू होता. त्यामुळे सदर दाव्याची माहिती वादी क्र. ६ चे वारसांना नसलेमुळे व सदरची माहिती दि. ०५/११/२०२२रोजी वादी क. १ कडून समजलेमुळे ताबडतोब अर्ज दाखल केला आहे. वादी क्र. ६ चे वारसांना दाव्याची माहिती न झालेमुळे सुमारे २ वर्षे ४ महिने १७ दिवसांचा विलंब झालाआहे. सदरचा विलंब हा जाणूनबुजून केलेला नाही. सदरचा विलंब माफ झाला तर प्रतिवादींचे काहीही नुकसान होणार नाही. तरी न्यायाचे दृष्टीने झालेला विलंब माफ करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०३.** सदर अर्जास प्रतिवादीतर्फे म्हणणे देऊन त्यांनी असे कथन केले की, वादीचा अर्ज खोटा व लबाडीचा असून तो प्रतिवादीस मान्य नाही. वादीने विलंब माफीचे अर्जास दिलेले कारण खोटे आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** सदरच्या अर्जावर दोन्ही वकिलांचा युक्तिवाद ऐकला. दाव्याचे रेकॉर्ड तपासून पाहिले असता वादींचे कथनानुसार सदरचा दावा चालू असताना वादी क्र. ०६ सैदाबी अब्बास तांबोळी या

मयत झालेल्या आहेत. परंतु कोरोना साथीमुळे वादींना अर्ज देणे शक्य झाले नाही. सदर कथनांच्या पुष्टयर्थ वादीने निशाणी ७२ येथे शपथपत्र दाखल केले आहे. तरी देखील मुदतीमध्ये वारस रेकॉर्डवर न घेतल्याची बाब स्पष्ट होते. वादींनी अर्जामध्ये नमूद केलेले कारण तसेच दाव्यातील मागणी पाहता, वादाचा विषय गुणदोषावर निर्गत होणे आवश्यक आहे. जर वादी क्र. ६ यांचे वारसांना वारस रेकॉर्डवर घेण्याची संधी देवून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली नाही तर ते त्यांच्या न्यायहक्कापासून वंचित राहू शकतात. त्याहीपेक्षा तुर्तास दावा अत्यंत प्राथमिक स्वरुपात आहे. ही बाब निश्चितपणे जाणवते की, वादीच्या कृत्यामुळे प्रतिवादीस विनाकारण विलंब आणि मानसिक त्रास सहन करावा लागला, परंतु सदरची बाब ही वादीवर आर्थिक भूर्दंड लादल्यानंतर काहीअंशी कमी करता येवू शकते. याउलट, अर्ज नामंजूर केल्याने प्रक्रियात्मक विलंब वाढून आणखी जटील बनू शकते. वरील सर्व कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो –

## आदेश

१. अर्ज नि. ७१ वादी क्र. ६ चे वारसांनी रक्कम रु. ३००/– प्रतिवादीस दंड देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. वादी क्र. ०६ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

सांगोला
दिनांक – ०३/०७/२०२३.

(श्री. संजय मो. घुगे)
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला.